लोकसत्ता रविवार वृत्तान्त

(सविस्तर वृत्त)

# मिशन फिलाडेल्फिया कन्व्हेन्शन!

रवींद्र पाथरे

अमेरिकेतील मराठी मंडळींचं दर दोन वर्षांनी भरणारं बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन अलीकडेच- म्हणजे जुलै २००७ मध्ये मोठ्या थाटामाटात पार पडलं. या संमेलनाचं सूप वाजतं- न वाजतं तोच ही मंडळी २००९ मध्ये फिलाडेल्फियात होणाऱ्या पुढच्या अधिवेशनाच्या तयारीस लागलीसुद्धा! सुमारे दीड वर्ष आधीच फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या तयारीस लागण्याचं कारणही तसंच आहे. आजवर अमेरिका आणि युरोपातील मराठीजनांपुरतंच सीमित असलेलं हे अधिवेशन आता जगद्व्यापी करण्याचे वेध या मंडळींना लागले आहेत. या अधिवेशनास जागतिक पातळीवर व्यापक प्रसिद्धी मिळावी, त्यायोगे जगभरच्या मराठी मंडळींत आर्थिक तसंच व्यापारी व व्यावसायिक सहयोग घडवून समस्त मराठीजनांचा उत्कर्ष घडवून आणण्यास साहाय्यभूत व्हावं, त्यांच्यात आचार-विचारांची परस्पर देवाणघेवाण व्हावी, जेणेकरून मराठी माणसांच्या उत्थानास गती येऊ शकेल, असे अनेकानेक उद्देश यामागे आहेत. परदेशस्थ मराठीजन व मायभूमीतील मराठी मंडळी यांच्यात परस्पर माहितीचा सेतू उभारून, हे अधिवेशन अधिकाधिक यशस्वी कसे करता येईल, याचीही चाचपणी करण्यात येत आहे.

या सगळ्या गोष्टी आपल्या मायभूमीतील मराठीजनांसमोर मांडण्याकरिता फिलाडेल्फिया अधिवेशनाचे सहसंयोजक मंदार जोगळेकर, कार्यक्रम निवड आणि अर्थउभारणी समितीचे सदस्य डॉ. अनिल नेरुरकर आणि किरण जोगळेकर हे नुकतेच भारतात आले आहेत. अधिवेशन अधिक पारदर्शी व सर्वसमावेशक होण्यासाठी त्यांनी कंबर कसल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवते.

अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या या द्वैवार्षिक अधिवेशनाबद्दल महाराष्ट्रातील लोकांनाही उत्सुकता असली, तरी त्यासंबंधीची पुरेशी माहिती त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. यास्तव फिलाडेल्फिया अधिवेशनाची माहिती सर्वसंबंधितांपर्यंत पोहचविण्यासाठी पुणे आणि मुंबई येथे खास कार्यालयांची स्थापना करण्यात आली आहे. या अधिवेशनास महाराष्ट्र व गोव्यातून हजारावर लोकांची उपस्थिती अपेक्षित आहे. त्यांना व्हिसा आदी बाबींची पूर्तता करण्याकरिता या कार्यालयांतून साहाय्य करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या या अमेरिकावारीत त्यांना अमेरिकादर्शन घडविण्यासाठी महाराष्ट्रातील प्रमुख मराठी पर्यटन कंपन्यांचे टूर पॅकेजच्या आखणीसाठी साहाय्य घेण्यात येणार आहे. या अधिवेशनात केवळ मनोरंजनाचेच कार्यक्रम होणार नसून, त्यांच्याच जोडीनं महाराष्ट्र, गोवा, पेन्सिल्व्हेनिया, न्यू जर्सी येथील उद्योजकांचे भव्य ट्रेड फेअर एक्स्पोही भरविण्यात येणार आहे. या अधिवेशनात उद्योजकांची उद्यम परिषद आणि डॉक्टरांची वैद्यकीय परिषदही आयोजित करण्यात येईल. या परिषदांना भारतातून पाचशे ते सहाशे उद्योजक व डॉक्टर्स येणं अपेक्षित आहेत. ट्रेड फेअर एक्स्पोमध्ये ४०० ते ५०० स्टॉल्स असतील. त्यांचं बुकिंग, आमंत्रण व व्हिसासंबंधीत बाबींच्या पूर्ततेसाठी पुणे व मुंबई कार्यालयांतून आवश्यक ती मदत करण्यात येईल.

फिलाडेल्फिया अधिवेशनाचं वैशिष्ट्य म्हणजे अमेरिकेमधील जुन्या पिढीतील मराठी मंडळींबरोबरच अमेरिकेत जन्मलेली व वाढलेली नवी, तरुण मराठी पिढीही या अधिवेशनाच्या


Matrimonials

Register FREE on Naukri.com

Buy 1 & get 2 tickets Free

Send Flowers

Find Love, Friends on FROPPER!

Florist in Bangalore, Hyderabad, Chennai, Ahmedabad, Mumbai, Pune

A special issue by Loksatta for the readers in North America

लोकसत्ता MAHARASHTRA INTERNATIONAL



express cricket LIVE SCORE

Population First

Advertisements

Shaadi Matrimonials
Get Marriage Proposals by Email EVERYDAY!

Express Classifieds
Post and view free classifieds ad

Original Microsoft Software
Buy Now

Register FREE on Naukri.com.
200000+ Hot Job Openings!

Flowers & Gifts
Send flowers & Gifts

Book International flights
& get 10000 Money Back

Make Romance happen!
On Fropper Relationships!

Express Astrology
Know what's in the stars for you

Advertise with us

आखणीत सक्रीय सहभाग घेत आहे. चार दिवसांच्या या अधिवेशनात सहभागी होणाऱ्यांच्या आवडी-निवडीनुसार करमणुकीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी सात वेगवेगळ्या सभागृहांमध्ये ६० ते १०० वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यापैकी निम्मे कार्यक्रम महाराष्ट्र व गोव्यातून निमंत्रित करण्यात येतील. तर निम्मे कार्यक्रम अमेरिकानिवासी मराठी कलावंत सादर करतील. या कार्यक्रम निवडीची प्रक्रियाही अत्यंत पारदर्शी असेल. त्याकरता महाराष्ट्रात जाहिरातीद्वारे या निवडीची प्रक्रिया संबंधितांपर्यंत पोहचविली जाणार आहे. ज्यांना या अधिवेशनात कार्यक्रम सादर करण्याची इच्छा असेल, त्यांनी www.bmm2009philadelphia.org या वेबसाइटवर आपले सविस्तर प्रस्ताव पाठवावेत. (संपर्क : किरण जोगळेकर- मोबाइल क्र.- ९८२०८२५६७०, मंदार जोगळेकर- मोबाइल क्र.- ९८८११२४३४१) डिसेंबर २००८ पर्यंत सर्व कार्यक्रमांची निवड पक्की करण्यात येईल व ती संबंधितांना कळविण्यात येईल. लोककला, बालनाट्यं, व्यावसायिक व प्रायोगिक नाटकं, एकपात्री कार्यक्रम, नृत्य, संगीत, वादन, व्याख्यानं अशा विविध कार्यक्रमांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आणि त्याकरता 'गुणवत्ता' हा कुठल्याही कार्यक्रम निवडीचा एकमेव निकष असेल, हे अगोदरच स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यक्रमांच्या निवडीकरिता महाराष्ट्रातील त्या- त्या कला क्षेत्रातील जाणकार मंडळींचं मतही जाणून घेण्यात येणार आहे. नव्या मराठी चित्रपटाचा प्रीमियर तसंच मराठी चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्याचा मानसही अधिवेशनाच्या संयोजकांनी बोलून दाखविला. त्याचप्रमाणे अधिवेशनाच्या जागतिक प्रसिद्धीकरिता कधी नव्हे ते प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनाही आवर्जून पाचारण करण्यात येणार आहे. फिलाडेल्फिया अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी पुणे व मुंबई येथे स्थापन झालेल्या कार्यालयांचे संपर्क पत्ते असे- पुणे कार्यालय : 'बीएमएम २००९', द्वारा- धनंजय दातार, ६, सावली, सहवास सोसायटी लेन नं. १, कर्वे नगर, पुणे- ४११०५२. फोन- ९१२०- २५४१०२२६. मुंबई कार्यालय- 'बीएमएम २००९', द्वारा- डॉ. नंदिता आणि प्रदीप पालशेतकर, ५३४, बॉम्बे म्युच्युअल टेरेस, ऑपेरा हाऊस, मुंबई-४००००७. फोन- ९१२२- २३६४३३८९.

**Download Gangals Font**
Click this link to download Gangals Font ...

**Installation Guide**
Click this link to read Installation Guide of Gangals Font ...

**Keyboard Layout for Gangals**
Font Click this link to view/download Gangals Font keyboard layout ...

**About Gangals Font**
Click this link to read more details about Gangals font